असा. क्र. ६४ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, डिसेंबर २७, २००५ / पौष ६, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.** .. .. .. पृष्ठे ५५२-५५८

दिनांक २१ डिसेंबर २००५ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.

( मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २७ डिसेंबर २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. )

### महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९६४ चा महा. २०. **ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) अधिनियम, १९६३ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २००५ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या पूर्ण शीर्षकाची सुधारणा.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या पूर्ण शीर्षकामधील,— १९६४ चा महा. २०.

(१) " राज्यात स्थापन करावयाच्या बाजाराचे " या मजकुराऐवजी, " राज्यात स्थापन करावयाच्या बाजाराचा विकास व " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) " स्थापन करावयाच्या बाजाराचा " या मजकुरानंतर, " तसेच खाजगी बाजारांचा व शेतकरी-ग्राहक बाजारांचा " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या उद्देशिकेची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या उद्देशिकेमध्ये,—

(१) " राज्यात स्थापन करावयाच्या बाजाराचे " या मजकुराऐवजी, " राज्यात स्थापन करावयाच्या बाजाराचा विकास व " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) " स्थापन करावयाच्या बाजाराचे " या मजकुरानंतर, " तसेच खाजगी बाजारांचे व शेतकरी-ग्राहक बाजारांचे " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १च्या पोट-कलम (१) मध्ये, " (विनियमन)" या मजकुराऐवजी, " ( विकास व विनियमन) " हा मजकूर दाखल करण्यात येईल. —

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये,—

(१) खंड (इ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (इअ) " थेट पणन" म्हणजे, कलम ५ (ड) च्या पोट-कलम (१) अन्वये प्रत्यक्ष पणन लायसनधारकाने, शेतकऱ्यांकडून, कृषि उत्पन्नाची केलेली थेट खरेदी ; " ;

(२) खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (फ१) " शेतकरी-ग्राहक बाजार" म्हणजे, कलम ५ (ड) च्या पोट-कलम (२) अन्वये, लायसनधारकाने स्थापन केलेला बाजार; " ;

(३) खंड (जे) मधील, " पोट-कलम (१अ) च्या खंड (अ) अन्वये स्थापित केलेली मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती " या मजकुरानंतर " आणि पोट-कलम (१ब) च्या खंड (अ) अन्वये घोषित करण्यात आलेली विभागीय किंवा प्रादेशिक बाजार समिती " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(४) खंड (म) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (मअ) " खाजगी बाजार " म्हणजे, या अधिनियमाच्या कलम ५ ड च्या पोट-कलम (१) अन्वये लायसनधारकाने, स्थापन केलेला बाजार ;

(५) खंड (र) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (र१) " विशेष वस्तूंचा बाजार " म्हणजे, कलम ४ च्या पोट-कलम (४) अन्वये घोषित केलेला बाजार ; ".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (४) राज्य शासनास, विशिष्ट कृषि उत्पन्नाच्या उलाढालीचा आणि त्यासाठी लागणाऱ्या विशेष पायाभूत सुविधांचा विचार करून, कोणत्याही बाजार क्षेत्रासाठी, विद्यमान बाजाराशिवाय विशेष वस्तूंचा बाजार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, घोषित करता येईल. ".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० यामध्ये प्रकरण १-ब समाविष्ट करणे.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ५ क नंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल.

" प्रकरण एक-ब

**थेट पणन, खाजगी बाजार आणि शेतकरी-ग्राहक बाजार यांची स्थापना**

थेट पणन, खाजगी बाजार आणि शेतकरी-ग्राहक बाजार यांची स्थापना आणि विवादांचे निवारण.

**५ड.** (१) संचालकास, विहित करण्यात येतील अशा, अटी व शर्तींच्या अधीन राहून, पुढील गोष्टींकरिता, थेट पणन करण्यासाठी आणि एका किंवा अधिक बाजार क्षेत्रांमध्ये खाजगी बाजार स्थापन करण्यासाठी, कोणत्याही व्यक्तीस लायसन देता येईल.—

(अ) कृषि उत्पन्नावर प्रक्रिया करणे ;

(ब) विशिष्ट विनिर्देशाच्या कृषि उत्पन्नाचा व्यापार करणे ;

(क) कृषि उत्पन्नाची निर्यात करणे ;

(ड) कृषि उत्पन्नाची मूलवाढ करून प्रतवारी लावणे, आवेष्टन करणे आणि इतर कोणत्याही मार्गाने देवाणघेवाण करणे.

(२) (अ) संचालकास, विहित करण्यात येतील अशा, अटी व शर्तींच्या अधीन राहून, विहित पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे मान्य करणाऱ्या किंवा ते काम हाती घेणाऱ्या एखाद्या व्यक्तीस, शेतकरी-ग्राहक बाजार स्थापन करण्याकरिता लायसन देता येईल.

(ब) विक्रेत्याकडून कृषि उत्पन्नाच्या विक्रीवर बाजार सेवा आकार वसूल केला जाईल आणि तो शेतकरी-ग्राहक बाजाराच्या मालकाकडे पाठविला जाईल.

(क) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, ग्राहक-शेतकरी बाजारातील कृषि उत्पन्नाच्या विक्री किंवा खरेदीवर कोणतीही बाजार फी वसुलीयोग्य नसेल.

(३) (अ) थेट शेतकऱ्यांकडून कृषि उत्पन्न खरेदी करण्याची किंवा एका किंवा त्याहून अधिक बाजार क्षेत्रांमध्ये खाजगी बाजार किंवा ग्राहक-शेतकरी बाजार स्थापन करण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती, विहित केले असेल अशा रीतीने आणि अशा कालावधीसाठी ; लायसन मिळविण्यासाठी किंवा यथास्थिती, लायसनच्या नवीकरणासाठी, संचालकाकडे अर्ज करील.

(ब) अशा प्रत्येक अर्जासोबत, विहित करण्यात येईल अशी पर्याप्त सुरक्षा ठेव व फी जमा करण्यात येईल.

(क) लायसन मिळविण्यासाठी किंवा त्याच्या नवीकरणासाठी खंड (अ) अन्वये प्राप्त झालेला अर्ज, संचालकाकडून, पुढीलपैकी कोणत्याही कारणांसाठी नाकारला जाईल :—

(एक) अर्जदाराच्या नावे कोणत्याही बाजार समितीची किंवा राज्य पणन मंडळाची देणी देय असतील तर ;

(दोन) अर्जदार अज्ञान असेल तर ;

(तीन) अर्जदार नादार असेल तर ;

(चार) लेखी विनिर्दिष्ट करावयाची अन्य कोणतीही पुरेशी कारणे असतील तर.

(४) (अ) संचालकाला, पुढील कारणांसाठी लायसन निलंबित किंवा रद्द करता येईल आणि लायसनधारकाला, त्याचे लायसन निलंबित किंवा रद्द झाले असल्याचे लेखी कळविता येईल :—

(एक) लायसन हे बुद्धिपुरस्सर खोटे अभिवेदन करून किंवा लबाडीने मिळविले असेल तर ;

(दोन) लायसनधारकाने लायसनच्या कोणत्याही अटी किंवा शर्तीचा भंग केला असेल तर ;

(तीन) लायसनधारक नादार झाला असेल तर ; किंवा

(चार) लायसनधारक, या अधिनियमाखाली कोणत्याही अपराधासाठी सिद्धापराध ठरला असेल तर.

(ब) असे कोणतेही लायसन निलंबित किंवा रद्द का करू नये याबाबत कारणे दाखवण्याची वाजवी संधी त्याच्या धारकास देण्यात आल्याशिवाय ते निलंबित किंवा रद्द करण्यात येणार नाही.

(५) (अ) थेट पणन लायसनधारक, खाजगी बाजार, ग्राहक-शेतकरी बाजार किंवा बाजार समिती यांच्यामधील कोणताही विवाद, संचालकाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल. असा विवाद, दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, विहित रीतीने सोडविण्यात येईल.

(ब) वरील खंड (अ) अन्वये संचालकाने दिलेल्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, राज्य शासनाकडे अपील दाखल करता येईल.

(क) खंड (ब) अन्वये दाखल करावयाचे अपील हे, संचालकाच्या निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, करण्यात येईल.

(ड) राज्य शासनाने अपिलावर दिलेला आदेश अंतिम असेल.

(६) (अ) कलम २९ चे पोट-कलम (२) याचे खंड (एक), (दोन), (चार), (पाच), (सहा), (सात), (आठ), (नऊ), (दहा), (अकरा), (बारा), (तेरा), (वीस), (एकवीस), (पंचवीस) व (सव्वीस), कलम ३१ ची पोट-कलमे (१), (३) व (४) आणि कलमे ३२अ, ३४अ, ३९, ४०, ४१, ४२, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५२अ, ५६, ५७ व ५९ब योग्य त्या फेरफारांसह, थेट पणन लायसनधारक, खाजगी बाजार व शेतकरी-ग्राहक बाजार यांना लागू होतील.

(ब) खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, थेट पणन लायसनधारक, कलम ३१ नुसार, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास बाजार फी देईल आणि ते मंडळ, विहित रीतीने संबंधित बाजार समितीला ती फी संवितरित करील.

(७) या कलमान्वये स्थापन केलेल्या बाजारांचे लायसन देणे, व्यवस्थापन, पणन, व्यापार व इतर संबंधित कार्ये, यांचे विहित केलेल्या रीतीने विनियमन करण्यात येईल.".

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ७ ची सुधारणा.

"(३) पोट-कलम (१) व (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एकापेक्षा अधिक बाजार क्षेत्रांमध्ये व्यापार करण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही व्यापाऱ्यास, लायसन देण्याकरिता किंवा त्याचे नवीकरण करण्याकरिता, राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या अशा प्राधिकाऱ्याकडे किंवा अधिकाऱ्याकडे, विहित करण्यात येईल अशा तपशिलासह, अर्ज करता येईल. अशा अर्जामध्ये, अर्जदार व्यापारी ज्यांमध्ये व्यापार करण्यास इच्छुक असेल अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या नावांचा समावेश असेल आणि असे लायसन देणारा प्राधिकारी किंवा अधिकारी, संबंधित व्यापारी ज्यामध्ये व्यापार करण्यास हक्कदार असेल अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांची नावे लायसनमध्ये समाविष्ट करील. एकापेक्षा अधिक बाजार क्षेत्रांत व्यापार करण्यासाठी लायसन मिळण्याकरिता अर्ज करणाऱ्या व्यक्तीस, संबंधित प्राधिकाऱ्याकडे, किंवा अधिकाऱ्याकडे, विहित करण्यात येईल अशा दराने लायसन फी भरावी लागेल आणि अशी फी, असा प्राधिकारी किंवा यथास्थिति, अधिकारी आणि उक्त लायसनच्या कक्षेत येणाऱ्या पणन समित्या यांच्यामध्ये विहित रीतीने वाटून घेण्यात येईल.".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये,—

(१) पोट-कलम (१अ) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१ब) (अ) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही कृषि उत्पन्न बाजार समितीला एकापेक्षा अधिक जिल्ह्यांसाठी विभागीय बाजार समिती म्हणून किंवा एकापेक्षा अधिक तालुक्यांसाठी प्रादेशिक बाजार समिती म्हणून घोषित करता येईल.

(ब) राज्य शासनाने, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी विनिर्दिष्ट केले असेल असे क्षेत्र हे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी बाजार क्षेत्र असल्याचे मानण्यात येईल आणि त्या क्षेत्राकरिता असलेल्या बाजार समितीला, राज्य शासनाने अधिसूचित केले असेल अशा नावाने ओळखले जाईल आणि ती विभागीय किंवा प्रादेशिक बाजार समिती म्हणून कार्य करील.

(क) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, विभागीय किंवा प्रादेशिक बाजार समिती ही पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(एक) विभागीय बाजार समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये अंतर्भूत असलेल्या प्रत्येक जिल्ह्यामधील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी सदस्यांनी निवडून दिलेले, शेतकऱ्यांचे दोन प्रतिनिधी ; किंवा

(दोन) प्रादेशिक बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात अंतर्भूत असलेल्या प्रत्येक तालुक्यामधील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी सदस्यांनी निवडून दिलेला, शेतकऱ्यांचा एक प्रतिनिधी ;

(तीन) बाजार क्षेत्रामध्ये व्यापारी व अडत्या म्हणून काम करण्याचे लायसन धारण करणाऱ्या व्यापाऱ्यांनी व अडत्यांनी निवडून दिलेले दोन प्रतिनिधी ;

(चार) बाजार क्षेत्रात हमाल व तोलारी म्हणून काम करणाऱ्यांनी निवडून दिलेला, एक प्रतिनिधी ;

(पाच) राज्य पणन मंडळाचा एक प्रतिनिधी ;

(सहा) बाजार समितीच्या मुख्यालयाच्या जागी कार्यरत असलेल्या महानगरपालिकेचा किंवा नगर परिषदेचा एक प्रतिनिधी ;

(सात) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे किंवा त्याचा प्रतिनिधी.

(ड) खंड (क) च्या उप-खंड (पाच), (सहा) आणि (सात) खालील बाजार समितीचा सदस्य असलेल्या एखाद्या व्यक्तीस, समितीच्या चर्चेत भाग घेण्याचा हक्क असेल परंतु तिच्या बैठकीमध्ये मत देण्याचा हक्क असणार नाही.".

(२) पोट-कलम (२) मधील, " किंवा (१-अ) " या मजकुराऐवजी, " (१-अ) किंवा (१-ब) " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम ३५, पोट-कलम (१) मध्ये, विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३५ ची सुधारणा.

" परंतु आणखी असे की, राज्य पणन मंडळ, अर्हता आणि अनुभव यांनुसार, बाजार समित्यांवर सचिव म्हणून नियुक्त करण्यात यावयाच्या व्यक्तींची यादी तयार करील आणि नाव नोंदणी केलेल्या व्यक्तींच्या यादीतून एका व्यक्तीची सचिव म्हणून नियुक्ती करणे हे बाजार समित्यांवर बंधनकारक असेल.".

११. मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ ब मध्ये, — सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३९ ब ची सुधारणा.

(क) खंड (दोन-अ) वगळण्यात येईल;

(ख) खंड (सात) मध्ये, " निवडून द्यावयाचे " या मजकुराऐवजी " राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१२. मुख्य अधिनियमाच्या कलम ६०, पोट-कलम (२), खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६० ची सुधारणा.

" (अ-१) कलम ५ड अन्वये स्थापन केलेल्या बाजारांशी संबंधित, लायसन देणे, व्यवस्थापन, पणन, व्यापार व अन्य कोणत्याही बाबी या संबंधातील अटी व शर्ती आणि रीत विहित करणे ;".

१३. (१) या अधिनियमाद्वारे सुधारित करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारित करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ११७ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, डिसेंबर २७, २००५/पौष ६, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Agricultural Produce Marketing (Regulation) (Amendment) Act, 2005 (Mah. Act No. XLVIII of 2005), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XLVIII OF 2005.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 27th December 2005.)*

An Act further to amend the Maharashtra Agricultural Produce Marketing (Regulation) Act, 1963.

WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Agricultural Produce Marketing (Regulation) Act, 1963, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-sixth Year of the Republic of India as follows :— (Mah. XX of 1964.)

Short title and commencement.

**1.** *(1)* This Act may be called the Maharashtra Agricultural Produce Marketing (Regulation) (Amendment) Act, 2005.

*(2)* It shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette.*

Amendment of long title of Mah. XX of 1964.

**2.** In the Maharashtra Agricultural Produce Marketing (Regulation) Act, 1963 (hereinafter referred to as "the principal Act"), in the long title,— Mah. XX of 1964.

*(1)* after the words "An Act to" the words "develop and" shall be inserted ;

*(2)* after the words " and markets " the words " including private markets and farmer-consumer markets " shall be inserted.

Amendment of preamble of Mah. XX of 1964.

**3.** In the principal Act, in the preamble,—

*(1)* after the words " expedient to " the words " develop and " shall be inserted ;

*(2)* after the words " and markets " the words " including private markets and farmer-consumer markets " shall be inserted.

Amendment of section 1 of Mah. XX of 1964.

**4.** In section *1* of the principal Act, in sub-section *(1)*, for the brackets and word "(Regulation)" the brackets and words "(Development and Regulation)" shall be substituted.

Amendment of section 2 of Mah. XX of 1964.

**5.** In section *2* of the principal Act,—

*(1)* after clause *(e)*, the following clause shall be inserted, namely :—

"*(ea)* "direct marketing" means the purchase of the agriculture produce directly from the agriculturists by a direct marketing licence holder under sub-section *(1)* of section 5D;";

*(2)* after clause *(f)*, the following clause shall be inserted, namely :—

"*(f1)* "farmer-consumer market" means a market established by a licence holder under sub-section *(2)* of section 5D;";

*(3)* in clause *(j)*, after the words, brackets, figure and letters "clause *(a)* of sub-section *(1A)*" the words, brackets, figure and letters "and the Divisional or Regional Market Committee declared under clause *(a)* of sub-section *(1B)*" shall be inserted ;

*(4)* after clause *(m)*, the following clause shall be inserted, namely :—

"*(ma)* " private market " means a market established by a licence holder under sub-section *(1)* of section 5D;";

*(5)* after clause *(r)*, the following clause shall be inserted, namely:—

"*(r1)* " special commodity market " means a market declared under sub-section *(4)* of section *4*;".

**6.** In section 4 of the principal Act, after sub-section (*3*), the following sub-section shall be added, namely :— Amendment of section 4 of Mah. XX of 1964.

"*(4)* The State Government may, by notification in the *Official Gazette*, declare, in addition to the existing market, a special commodity market for any market area after considering the turnover and special infrastructure requirements for marketing of a particular agricultural produce.".

**7.** After section 5C of the principal Act, the following Chapter shall be inserted, namely :— Insertion of Chapter I-B in Mah. XX of 1964.

"CHAPTER I-B

DIRECT MARKETING, ESTABLISHMENT OF PRIVATE MARKET AND FARMER-CONSUMER MARKET

**5D.** *(1)* The Director may, subject to such terms and conditions as may be prescribed, grant licence of any person for direct marketing or for establishing a private market in one or more market areas for— Direct marketing establishment of private market and farmer consumer market and redressal of disputes.

*(a)* processing of the agricultural produce;

*(b)* trade of the agricultural produce of particular specification;

*(c)* export of the agricultural produce;

*(d)* grading, packing and transactions in any other way by value addition of the agricultural produce.

*(2) (a)* The Director may, subject to such terms and conditions as may be prescribed grant licence to any person, who agrees or undertakes to develop the prescribed infrastructure, for establishing farmer-consumer market.

*(b)* Market service charge shall be collected on sale of the agriculture produce by the seller and shall be remitted to the proprietor of the farmer-consumer market.

*(c)* Save as otherwise provided in this Act, no market fee shall be leviable on the sale or purchase of the agricultural produce in the farmer-consumer market.

*(3) (a)* Any person who desires to purchase agricultural produce directly from the agriculturists or to establish a private market or farmer-consumer market, in one or more than one market area, shall apply to the Director for grant or renewal of licence, as the case may be, in the manner and for the period, as may be prescribed.

*(b)* Alongwith every such application an adequate security deposit and a fee as may be prescribed shall be deposited.

*(c)* Application received under clause *(a)* for grant or renewal of licence shall be rejected by the Director for any of the following reasons, namely :—

*(i)* dues of any Market Committee or the State Marketing Board are outstanding the applicant;

*(ii)* the applicant is a minor ;

*(iii)* the application is an insolvent;

*(iv)* any other sufficient reason to be specified in writing.

*(4) (a)* The Director may suspend or cancel the licence and communicate to the licence holder in writing, about the suspension or cancellation of his licence, if—

*(i)* the licence has been obtained through wilful misrepresentation or fraud ;

*(ii)* the holder of the licence has committed a breach of any of the terms or conditions of licence ;

*(iii)* the holder of the licence has become an insolvent; or

*(iv)* the holder of the licence has been convicted of any offence under this Act.

*(b)* No licence shall be suspended or cancelled without giving a reasonable opportunity to its holder to show cause against such suspension or cancellation.

*(5) (a)* Any dispute between the direct marketing licence holder, private market, farmer-consumer market and the Market Committee, shall be referred to the Director. The dispute shall be resolved after giving the parties a reasonable opportunity of being heard, in the manner prescribed.

*(b)* Any person aggrieved by the decision of the Director under clause *(a)* may prefer an appeal to the State Government.

*(c)* An appeal under clause *(b)* shall be made within a period of thirty days from the date of the decision of the Director.

*(d)* The order passed in appeal by the State Government shall be final.

*(6) (a)* The provisions of clauses *(i)*, *(ii)*, *(iv)*, *(v)*, *(vi) (vii)*, *(viii)*, *(ix)*, *(x)*, *(xi) (xii)*, *(xiii)*, *(xx)*, *(xxi)*, *(xxv)* and *(xxvi)* of sub-section *(2)* of section 29, sub-sections *(1)*, *(3)* and *(4)* of section 31 and sections 32A, 34A, 39, 40, 41, 42, 48, 49, 50, 51, 52, 52A, 56, 57 and 59B shall apply, *mutatis mutandis*, to direct marketing licence holder, private market and farmer-consumer market.

*(b)* Notwithstanding anything contained in clauses *(a)*, direct marketing licence holder shall pay the market fee as per section 31 to the Maharashtra State Agricultural Marketing Board, who, in turn shall disburse the same to the concerned Market Committee, in the manner prescribed.

*(7)* The licensing, management, marketing, trading and other related functions of the markets established under this section shall be regulated in the manner prescribed.".

Amendment of section 7 of Mah. XX of 1964.

**8.** In section 7 of the principal Act, after sub-section *(2)*, the following sub-sections shall be added, namely :—

" *(3)* Notwithstanding anything contained in sub-sections *(1)* and *(2)*, any trader who desires to operate in more than one market area, may apply to such authority or officer notified by the State Government for grant or renewal of licence with such details, as may be prescribed. Such application shall contain the names of the Agricultural Produce Market Committees in which the applicant trader wants to operate and the authority or officer granting such licence shall incorporate in the licence the names of such Agricultural Produce Market Committees in which concerned trader shall be entitled to operate. The person applying for licence to operate in more than one market area, shall be required to pay the licence fee at such rate, as may be prescribed, to the concerned authority or officer and such fee shall be shared in the manner prescribed, between such authority or, as the case may be officer and the Marketing Committees which are covered under the said licence."

Amendment of section 13 of Mah. XX of 1964.

**9.** In section 13 of the principal Act,—

*(1)* after sub-section *(1A)*, the following sub-section shall be inserted, namely :—

"*(1B) (a)* Notwithstanding anything contained in any provisions of this Act, the State Government may, by notification in the *Official Gazette*, declare any Agricultural Produce Market Committee to be the Divisional Market Committee for more than one districts or Regional Market Committee for more than one talukas.

*(b)* The area specified by the State Government by notification in the *Offical Gazette*, from time to time, shall be deemed to be the market area for the purposes of this Act and the Market Committee for that area shall be called by the name as may be notified by the State Government and it shall function as the Divisional or Regional Market Committee.

*(c)* The Divisional or Regional Market Committee shall, subject to the provisional of sub-section *(2)*, consist of the following members, namely :—

*(i)* two representatives of the agriculturists, elected by the agriculturist members of the Agricultural Produce Market Committee from each district included in the area of operation of the Divisional Market Committee; or

*(ii)* one representative from the agriculturists elected by the agriculturist members of the Agricultural Produce Market Committee from each taluka included in the area of operation of the Regional Market Committee;

*(iii)* two representative, elected by the traders and commission agents, holding licences to operate as such in the market area;

*(iv)* one representative, elected by the *hamals* and weighmen operating as such in the market area;

*(v)* one representative of the State Marketing Board;

*(vi)* one representative of the Municipal Corporation or Municipal Council functioning at the Head Quarters of the Market Committee;

*(vii)* the Director of Marketing, Maharashtra State, Pune or his representative.

*(d)* A person who is a member of the Market Committee under sub-clauses *(v)*, *(vi)* and *(vii)* of clause *(c)*, shall have a right to take part in the discussions of the Committee, but shall not have right to vote at a meeting thereof.".

*(2)* in sub-section *(2)*, for the word, brackets, figure and letter "or *(1A)*" the brackets, figures, letters and word ", *(1A)* or *(1B)*" shall be substituted.

**10.** In section 35 of the principal Act, in sub-section *(1)*, after the existing proviso, the following proviso shall be added, namely :— Amendment of section 35 of Mah. XX of 1964.

"Provided further that, the State Marketing Board shall prepare a list of the persons to be appointed as the Secretaries on the Market Committees according to their qualification and experience and it shall be binding on the Market Committees to appoint a person as Secretary from the list of persons enrolled."

**11.** In section 39B of the principal Act,— Amendment of section 39B of Mah. XX of 1964.

*(a)* clause *(ii-a)* shall be deleted ;

*(b)* in clause *(vii)*, for the word "elected" the words "nominated by the State Government" shall be substituted.

**12.** In section 60 of the principal Act, in sub-section *(2)*, after clause (a), the following clause shall be inserted, namely :— Amendment of section 60 of Mah. XX of 1964.

"*(a-1)* under section 5D, for prescribing the terms and conditions and the manner of licensing management marketing, trading and any other matters, relating to markets established under that section;".

**13.** *(1)* If any difficulty arises in giving effect to any of the provisions of the principal Act, as amended by this Act, the State Government may, as occasion arises, by an order published in the *Official Gazette*, do anything, not inconsistent with the provisions of the principal Act, as amended by this Act, which appears to it to be necessary or expedient for the purpose of removing the diffculty : Power to remove difficulties.

Provided that, no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of this Act.

*(2)* Every order made under sub-section *(1)* shall be laid, as soon as as may be, after it is made, before each House of the State Legislature.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ७ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण
प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, जानेवारी १७, २००६/पौष २७, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

*ERRATA*

In the Maharashtra Agricultural Produce Marketing (Regulation) (Amendment) Act, 2005 (Mah. XLVIII of 2005), published at pages 873-879 of the *Maharashtra Government Gazette*, Part VIII, Extraordinary, dated the 27th December 2005,—

(*a*) on page 873, in line 23, *for* " *Official Gazette* " *read* " *Official Gazette*, appoint. ";

(*b*) on page 875, in line 14, *for* " licence of " *read* " licence to ";

(*c*) on page 876,—

(*i*) in line 13, *for* " outstanding " *read* " outstanding against ";

(*ii*) in line 15, *for* " application " *read* " applicant ";

(*d*) on page 877,—

(*i*) in line 7, *for* " clauses " *read* " clause ";

(*ii*) in line 31, *for* " may be " *read* " may be, ";

(*e*) on page 878, in line 8, *for* " provisional " *read* " provisions ";

(*f*) on page 879, in line 16, *for* " licensing management marketing, " *read* " licensing, management, marketing, ".



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई